# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. ०१/२०१७ दाखल दि. १२.०१.२०१७**

| | |
|---|---|
| **श्री. गजानन रघुनाथ साळवी**<br>**मु.पो. खोडदे,**<br>**ता. गुहागर**<br>**जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) वि.श. गुळवणी**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. एस. एस. तायडे,**<br>**प्रभारी सचिव तथा कार्यकारी अभियंता** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) अजित रघुनाथ साळवी** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. ए.व्ही.मोहिते**<br>**अतिरिक्त कार्याकारी अभियंता** |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग, [ ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) ] विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

## न्यायनिर्णय

मी वि.श.गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोकण परिमंडल,रत्नागिरी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश देत आहे.

१) तक्रारदार- श्री. गजानन रघुनाथ साळवी,रा. सध्या जुना माळ नाका रत्नागिरी यांचे मौजे खोडदे, ता.गुहागर येथे घर असून तेथील वीजपुरवठयाचे एकूण ९४ महिन्यांचे १२१६० युनिटचे रु. ५२,२६७.७३/- पै. इतके वीजदेयक त्यांना नोव्हेंबर २०१६ मध्ये देणेत आले. त्याबाबत त्यांनी दि.११.११.२०१६ रोजी तक्रारही दिली. दि.०६.०१.२०१७ रोजी विरुध्द पक्षकार यांचे कर्मचारी वीजपुरवठा बंद करण्यास गेले होते, परंतु, तोंडी विनंतीवरुन तो बंद केला नाही. दि.०९.०१.२०१७ रोजी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे गाऱ्हाणे दाखल केले आहे. परंतु पुन्हा वीजपुरवठा खंडीत करण्याची नोटीस घराच्या दारावर लावल्यामुळे तक्रारदार यांनी अंतरीम आदेशासाठी हे प्रकरण या मंचापुढे दाखल केले आहे.

२) विरुध्द पक्षकार यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार यांचा मीटर बदली केलेला होता व मीटर बदलाची नोंद बिलींग मध्ये घेण्यास विलंब झाल्यामुळे ऑक्टोबर २०१६ मध्ये मीटर बदलण्याची नोंद घेऊन ९४ महिन्यांचे देयक दिले आहे. त्यांना स्लॅब बेनिफिट दिला आहे.सदर देयक रिडींगप्रमाणे बरोबर आहे. देयक त्यांनी भरले नाही म्हणून १५ दिवसांची वीजपुरवठा खंडीत करणेबाबत नोटीस त्यांना दिलेली आहे.

३) या प्रकरणात खालील अंतरीम मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना त्यांनी विनंती केल्याप्रमाणे अंतरीम आदेश देता येईल काय?

उत्तर - अंशतः होकारार्थी.

२) कोणता अंतरीम आदेश?

उत्तर- शेवटी लिहिल्याप्रमाणे.

संक्षिप्त कारणे-

४) दि.२३.०१.२०१७ रोजी उभयपक्षकारांना दूरध्वनीवरुन अंतरीम सुनावणीच्या नोटीसा समक्ष देणेत आल्या. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. बिवलकर पुणे येथे सध्या गेले असल्यामुळे त्यांनी फोनवर आपले म्हणणे थोडक्यात मांडले. तक्रारदार यांचे बंधू श्री. अजित रघुनाथ साळवी यांनी तोंडी निवेदन सांगितले. विरुध्द पक्षकारातर्फे लेखापाल श्री. अशोक मोहिते यांनी तोंडी निवेदन दिले.

५) वादग्रस्त विषय सध्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांचेसमोर प्रलंबित आहे. त्यामुळे या अंतरिम आदेशासाठी सविस्तर उहापोह करण्याची आवश्यकता नाही. सदर कक्षाने, या अंतरिम आदेशाने प्रभावित न होता स्वतंत्रपणे न्यायनिर्णय करावा.

६) तक्रारदारांचे कुटुंब खोडदे येथील घरात २०१०-११ पासून रहात नाही व अधूनमधून सणांच्या निमित्ताने तिकडे जातात. त्यांना ऑक्टोबर २०१६ चे देयक १२१६० युनिटचे रु. ५२,२६७.७३ चे एकूण ९४ महिन्यांचे देणेत आले आहे. दि. ०४.०२.२००९ रोजी नवीन मीटर बसविणेत आले होते. सदर मीटर सदोष असल्याचे कोणाचेही म्हणणे नाही. मीटरमध्ये योग्यरित्या रिडींग होत असूनही मीटर बदलण्याची नोंद बिलींग आयटी सिस्टीम मध्ये न झाल्यामुळे तक्रारदार यांना सरासरीप्रमाणे वीजदेयके देण्यात आली होती. मीटर बदल घेण्यास झालेला कथित विलंब यास तक्रारदार यांना जबाबदार धरता येत नाही.

७) ते काहीही असो, विद्युत कायदा कलम ५६(२) प्रमाणे मागील दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या देयकाची मागणी सकृतदर्शनी मुदतबाहय ठरते. सन २०१०-११ मध्से असलेले वीजेचे दर, त्यामध्ये वेळोवेळी होत गेलेली कमी अधिक दरवाढ आणि मागील दोन वर्षातील वीजेचे दर विचारात घेता तक्रारदार यांचेकडून १/३ म्हणजे रु. १७,५००/- इतकी रक्कम भरुन घेऊन अंतरिम आदेश करणे योग्य

होईल असे वाटते. अर्थात् सदरची जमा होणारी रक्कम या अगर तीचा काही भाग प्रकरणात होणाऱ्या अंतिम निर्णयाचे अधीन राहील आणि जरुर तर समायोजन होणेसही पात्र राहील.

८) नोव्हेंबर २०१६ पासूनची वीजदेयके विरुध्द पक्षकार यांनी प्रत्यक्ष वापराप्रमाणे तक्रारदार यांचेकडून तूर्त म्हणजे पुढील आदेशार्यंत स्विकारत जावीत असाही अंतरीम आदेश करणेत येतो.

९) प्रस्तुतचा आदेश हा केवळ तात्पुरत्या स्वरुपाचा, सकृतदर्शनी विचार करुन पारित करणेत आला आहे. सदर आदेश हा गुणदोषावर (On merits) करणेत आलेला नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने प्रस्तुत अंतरीम आदेशाने प्रभावित न होता स्वतंत्रपणे, उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घ्यावा ही बाब स्पष्ट करणेत येत आहे.

सबब खालीलप्रमाणे अंतरीम आदेश करणेत येतो.

## <u>अंतरीम आदेश</u>

**१) तक्रारदार श्री.गजानन रघुनाथ साळवी यांनी अगर त्यांच्यातर्फे रक्कम रु. १७,५००/- ( सतरा हजार पाचशे फक्त) दि.१०.०२.२०१७ रोजी अगर त्यापूर्वी विरुध्द पक्षकार यांच्या कार्यालयात भरणा करावी. याप्रमाणे रक्कम मुदतीत भरणा केल्यानंतर पुढील आदेशापर्यंत तक्रारदार यांच्या उपरोक्त घराचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये.**

**२) तक्रारदार यांना सदर रक्कम भरण्यास अवधी दिला असल्यामुळे प्रथमतः त्यांचा वीजपुरवठा दि. १०.०२.२०१७ पर्यंत खंडीत करणेत येऊ नये.**

**३) तक्रारदार यांना देण्यात आलेली अगर यापुढे देण्यात येणारी नोव्हेंबर २०१६ पासूनची वीजदेयके त्यांच्या प्रत्यक्ष वीजवापरानुसार, पुढील आदेशापर्यंत,स्विकारणेत यावीत.**

**४) तक्रारदार यांचेकडून वरीलप्रमाणे जमा होणारी रक्कम त्यांना Under Protest भरणा करता येईल आणि ती रक्कम वादातील प्रकरणाच्या अंतिम निर्णयाचे अधीन राहील आणि जरुर तर सदर रक्कम अगर तिचा काही भाग समायोजन होणेसही पात्र राहील.**

**५) वरीलप्रमाणे अंतरिम आदेशासाठी दाखल केलेले हे गाऱ्हाणे निकाली करणेत येत आहे.**

**६) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**वि. श. गुळवणी**
**अध्यक्ष,**
**ग्रातनिमं,कोकण परिमंडल**

**श्री .एस.एस.तायडे**
**प्रभारी सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २५.०१.२०१७**
**ठिकाण :- रत्नागिरी.**